नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 02/04/2021 (शुक्रवार)
(दुपार)

---

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो. स्टे. उमरेड :– फिर्यादी नामे– सौ. स्मिता शुभम पजई वय 19 वर्ष रा. ह. मु. कावरापेठ उमरेड व आरोपी नामे– 1) पति– 1) शुभम प्रभाकर पजई हे दोघेही पतीपत्नी आहेत. अंतर्गत तुकडोजी पुतळा मागे प्लॉट. नं. 240 एन.एम.सी. च्या समोर नागपुर येथे दिनांक 30/06/2021 चे 22.00 वा. ते दिनांक 09/08/2021 चे 12.30 वा. सुमारास आरोपी पती यांने फिर्यादी हिला म्हटले की, "तु आपल्या माहेरी वडिलांकडे जायचे नाही व वडीलांना नागपुरला बोलवायचे नाही" या कारणावरून आरोपीने तिला हातबुक्कीने मारहाण केली. त्यामुळे फिर्यादी ही आपल्या माहेरी राहत आहे. तेव्हापासुन फिर्यादीला आरोपी पती घ्यायला आला नाही. फिर्यादीचे पतीने महीला सेल नागपुर मार्फत पो. स्टे ला तक्रार दिली होती. फिर्यादी व आरोपी या दोघांनाही पो. स्टे. अधिकारी यांचे मार्फतीने समजावण्यात आले परंतु त्यांचा आपसी समझौता झाला नाही. आरोपी पती फिर्यादीला नांदवयास तयार नाही. तिला आरोपी पती व भासरे आरोपी क्र. 2) रवि प्रभाकर पजई, दोन्ही रा. तुकडोजी पुतळा मागे प्लॉट नं. 240 एन.एम.सी. च्या समोर नागपुर यांनी तिला मानसिक व शारीरिक त्रास दिल्याने सदरचा गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 498 (अ) भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि शितल खोब्रागडे पो. स्टे. उमरेड मो. क्र.8308082094 या करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 15 कि. मी. अंतरावरील मौजा माहुरझरी ते ब्राम्हणवाडा रोड येथे दिनांक 10/03/2021 चे 19:15 वा. दरम्यान मृतक नामे– रमेश माधवराव डाहाके, वय 45 वर्ष रा, ब्राम्हणवाडा हा कळमेश्वर वरून फेटरी मार्गे ब्राम्हणवाडा येथे त्याच्या एमएच– 40/ एजे– 0663 क्रमांकाच्या मोटरसायकलने जात होता. त्यादरम्यान त्याची मोटरसायकल स्लिप झाल्याने तो रोडवर पडल्याने त्याच्या डोक्याला व कानाला गंभीर मार लागला. त्यास उपचाराकामी प्रथम ॲलेक्सीस हॉस्पीटल मानकापूर नागपुर व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता उपचारा दरम्यान दि. 11/03/2021 चे 20.35 वा. मरण पावला. मेडीकल पोलिस बुथ नागपुर येथुन प्राप्त कागद पत्रावरून मर्ग क्र 26/21 कलम 174 जाफौ अन्वये दाखल असुन चौकशी अहवाल वरून सदर गुन्हा नोद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विलास माधवराव डाहाके वय 51 वर्षे रा ब्राम्हणवाडा वार्ड क्र 2 यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री गायकवाड मोनं 9923988292 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष